महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
Maharashtra University of Health Sciences, Nashik
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel : (0253) 2539193/6659235 Student Helpline : (0253) 2539111 / 6659111
Website : www.muhs.ac.in, E-mail : academic1@muhs.ac.in

**डॉ.कालिदास द.चव्हाण**
एम.बी.बी.एस ,एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र), पीएच.डी, डी.एस्सी
**कुलसचिव**

**Dr.Kalidas D. Chavan**
**M.B.B.S , M.D.(Forensic Medicine),Ph.D, D.Sc**
**Registrar**

संदर्भ क्र :मआविवि/शै.वि.-१/ई-३/पदवी व पदव्युत्तर/१२०२/२०२२ दि.०९/०५/२०२२

## परिपत्रक क्र.४७/२०२२

विषय : भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, यांनी दि. १६/०२/२०२२ अन्वये विहीत केलेले अभ्यासक्रम व किमान मानके (MSR) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासुन लागु करणेबाबत

संदर्भ : १)भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांचे दिनांक १६/०२/२०२२ रोजीचे राजपत्र

२) भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांचे दिनांक -२८/०२/२०२२ रोजीचे राजपत्र

३) आयुर्वेद व युनानी विद्याशाखेच्या दि. ०४/०४/२०२२ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.०६/२०२२

४) विद्यापरिषदेच्या दि.२२/०४/२०२२ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.२९/२०२२.

उपरोक्त विषयानुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोगाने वरील अधिसुचनेअन्वये आयुर्वेद व युनानी विद्याशाखेकरीता किमान मानके व बी.ए.एम.एस. आणि बी.यु.एम.एस. प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम प्रसिध्द केला असुन सदर विषय दिनांक ०४/०४/२०२२ रोजी संपन्न झालेल्या विद्याशाखेच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने विद्याशाखेने केलेली शिफारस दिनांक २२/०४/२०२२ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर करण्यात आली असता विद्यापरिषदेने ठराव क्र. २९/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

> " *भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी आयुर्वेद व युनानी विद्याशाखेकरीता विहीत केलेले किमान मानके लागु करण्यात याव्यात. तसेच, अभ्यासमंडळ व विद्याशाखा यांनी शिफारस केलेला बी.ए.एम.एस. व बी.यु.एम.एस.प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासुन प्रवेशित तुकडी पासुन लागु करण्यास मान्यता प्रदान करण्यात यावी.* "

उपरोक्त ठरावानुसार केंद्रीय आयोग यांनी विहीत केल्यानुसार किमान मानके व प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रवेशित तुकडीपासुन विद्यापीठ संलग्नित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयांना लागु करण्यात येत आहे.

(कृ.मा.पा.)

तरी सर्व अधिष्ठाता व प्राचार्य यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकास सर्व शिक्षकांच्या व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनस आणुन द्यावी व महाविद्यालयीन स्तरावर व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

सही/-
कुलसचिव

प्रति,
सर्व अधिष्ठाता / प्राचार्य,
आयुर्वेद व युनानी महाविद्यालय
म.आ.वि.वि.नाशिक

सोबत : १) प्रथम वर्ष बी.ए.एम.एस. अभ्यासक्रम
२) प्रथम वर्ष बी.यु.एम.एस. अभ्यासक्रम

प्रत माहितीस्तव : १) अधिष्ठाता आयुर्वेद व युनानी विद्याशाखा, म.आ.वि.वि.नाशिक
२) परीक्षा नियंत्रक, म.आ.वि.वि.नाशिक
३) प्र. संचालक, नियोजन विभाग, म.आ.वि.वि.नाशिक
४) विभाग प्रमुख, पात्रता विभाग, म.आ.वि.वि.नाशिक